॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ रविवार, दि. ७ जून २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक १३ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


✽ सुविचार ✽

मानवी नात्यांमध्ये सर्वात मोठा शत्रू म्हणजे गैरसमज.

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### झुरळ

असंतोषाचे वाहक
बनले आहे झुरळ
त्यातूनच तरुणाईला
बदलाची भुरळ
पदव्यांचे होते भेंडोळे
स्वप्न सारे विकून
हेच फळ कायमचे
एवढे नुसते शिकून

## SPOT NEWS

### २ कोटींचा औषध साठा जप्त

**मुंबई** – भिवंडी, पालघर आणि मुंबई येथील तीन आस्थापनांमधून एकूण ८१ लक्ष किमतीचा औषध साठा जप्त करण्यात आला असून १ कोटी ३५ लाख रुपये किमतीचा सर्जिकल ग्लोव्हज साठा गुणवत्ता चाचणीसाठी प्रतिबंधित करण्यात आला आहे. अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या आदेशानुसार या तपासणी मोहीम कारवाईत औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० आणि नियमांचा भंग करणाऱ्या कंपन्यांविरोधात कारवाई करण्यात आली आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या तपास पथकाने मे.साची मेडिक, साकीनाका या आस्थापनावर टाकलेल्या छाप्यात परवाने व नोंदणी नसलेल्या व्यावसायिकाने मलेशिया येथून विना निर्जंतुकीकरण सर्जिकल ग्लोव्हजची आयात करून कोणत्याही परवान्याशिवाय साठवणूक व विक्री केल्याचे उघड झाले. आयात केलेले ग्लोव्हजची वाडा व भिवंडी येथील वैद्यकीय उपकरणे उत्पादन परवाने असलेल्या व्यावसायास पँकिग व लेबलीग करून पुढे त्याची विक्री करण्यास पुरवठा केला असल्याचे आढळून आले. या कारवाईत ७४.८५ रुपये किमतीचे 'विना निर्जंतुकीकरण सर्जिकल ग्लोव्हज' जप्त करण्यात आले. कागदपत्रांनुसार या पेढीने मुंबई महानगरपालिका रुग्णालयांना पुरवठा/विक्री केल्याचे आढळून आले आहे.

# कॉकरोच पार्टीचे जंतर-मंतरवर आंदोलन

## केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी । आंदोलक आक्रमक, सरकारला ५ दिवसांचा अल्टिमेटम

**नवी दिल्ली । वीरभूमी** –

विविध शैक्षणिक आणि भरती परीक्षांमधील गैरव्यवहार आणि पेपरफुटीच्या मुद्यावरून देशातील तरुण वर्ग आक्रमक झाला आहे. कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके आज सकाळी भारतात परतले असून, त्यांनी दिल्लीतील जंतरमंतर येथे या भव्य आंदोलनाचे नेतृत्व केले. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करीत हजारो विद्यार्थी आणि तरुणांनी या आंदोलनात सहभाग घेतला. या आंदोलनादरम्यान जंतर-मंतर परिसरात कडक सुरक्षा तैनात करण्यात आली होती. दरम्यान, सायंकाळी ५ वाजेपर्यंत केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. परंतु सरकारने कुठलीही प्रतिक्रिया न दिल्याने आता ५ दिवसांची मुदत वाढविली. त्यानंतर देशभरात आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिला.



हे आंदोलन जनतेमधील तीव्र असंतोष आणि निराशेचा परिणाम आहे. कॉकरोच जनता पार्टीची मागणी आहे की, एक तर धर्मेंद्र प्रधान यांनी स्वत: राजीनामा द्यावा किंवा सरकारने त्यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करावी. या आंदोलनात शाळा-महाविद्यालयाचे विद्यार्थी, पालक आणि तरुण व्यावसायिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अनेक आंदोलकांनी चेह-यावर कॉकरोचचे मास्क लावले होते आणि हातात फुले घेतली होती. आंदोलनस्थळी तरुणांनी धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या, अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. याच आंदोलनात जय भीमच्या घोषणाही देण्यात आल्या. सोशल मीडियावरून सुरू झालेली ही चळवळ आता थेट रस्त्यावर उतरल्याने केंद्र सरकारवरील दबाव वाढला आहे.

या आंदोलनादरम्यान बोलताना कॉकरोच जनता पार्टीचे प्रमुख अभिजित दिपके म्हणाले की, आपला हा लढा मोठा आहे. आम्ही गेल्या एका महिन्यापासून सोशल मीडियावर शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करीत आहोत. मात्र, कारवाई करण्याऐवजी आमचे सोशल मीडिया अकाऊंटस् हॅक करणे, पोस्ट डिलिट करण्याचे काम केले जात आहे. तुम्ही आमच्या पोस्ट डिलीट करू शकता, पण आम्हाला इथून हटवू शकत नाही, या आंदोलनादरम्यान दिपके यांच्या हातात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आत्मचरित्र पाहायला मिळाले. दरम्यान सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांनीही कॉकरोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखालील आंदोलनात सहभाग नोंदवला आणि मार्गदर्शनही केले.

मी माझ्या आई-वडिलांना भेटायला घरी जात आहे. त्यांना भेटून आता एक वर्षापेक्षा जास्त काळ लोटला आहे. गेल्या १५ दिवसांपासून त्यांना खूप त्रास सहन करावा लागला आहे आणि धमक्यांमुळे त्यांना घर सोडावे लागले आहे. मी त्यांना घरी परत घेऊन जाणार आहे. तुमच्या माहितीसाठी आजचे आंदोलन फक्त एक ट्रेलर होते. इतक्या मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याबद्दल धन्यवाद, असे अभिजित दिपकेने म्हटले.

## रायगडावर ३५२ वा शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात

**रायगड । वीरभूमी** –

किल्ले रायगडावर आज छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५२ व्या शिवराज्याभिषेक सोहळ्याचा अभूतपूर्व आणि उत्साहपूर्ण जल्लोष पाहायला मिळाला. या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून हजारो शिवप्रेमी आणि शिवभक्त रायगडावर दाखल झाले होते. हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण गड परिसर शिवमय झाला असून, 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' या जयघोषाने रायगडचा परिसर दुमदुमून गेला होता.

या ऐतिहासिक सोहळ्याचे महत्त्व अधोरेखित करताना संभाजीराजे छत्रपती यांनी एक अत्यंत मोठे आणि महत्त्वपूर्ण विधान केले. शिवराज्याभिषेक दिन हाच खऱ्या अर्थाने भारताचा पहिला स्वातंत्र्यदिन होता, असे प्रतिपादन त्यांनी केले. संभाजीराजे म्हणाले की, १९४७ मध्ये देशाला ब्रिटिश सत्तेतून स्वातंत्र्य मिळाले, हा दिवस निश्चितच ऐतिहासिक आहे. मात्र, त्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय सत्तांविरोधात लढा देत स्वराज्य उभे केले आणि जनतेला स्वाभिमानाचा मार्ग दाखवला. विविध जुलमी सत्तांच्या जोखडातून समाजाला मुक्त करून स्वतंत्र राज्यव्यवस्था निर्माण केली. त्यामुळे भारताचा पहिला स्वातंत्र्य दिन कोणता असेल, तर तो छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा दिवसच आहे, असे सांगत त्यांनी उपस्थित शिवभक्तांना स्वराज्याचा इतिहास आणि त्यामागील प्रेरणा जपण्याचे आवाहन केले.

# मान्सून अखेर महाराष्ट्रात दाखल

**मुंबई । वीरभूमी** –

राज्यात उन्हाच्या तीव्र झळा सोसणाऱ्या नागरिकांसाठी आणि चातकासारखी पाण्याची वाट पाहणाऱ्या बळीराजासाठी आनंदाची बातमी आहे. मान्सून अखेर शनिवारी महाराष्ट्रात दाखल झाला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मान्सूनने दक्षिण कोकणच्या काही भागांसह गोव्यात पूर्णपणे प्रवेश केला असून, महाराष्ट्राच्या काही भागात त्याची आगेकूच सुरू आहे.

६ जून रोजी मान्सूनच्या प्रवासाचा वेग चांगला होता. हवामान खात्याकडील माहितीनुसार, मान्सून संपूर्ण गोवा राज्य आणि महाराष्ट्राचा काही भाग (दक्षिण कोकणचा भाग), कर्नाटकचा आणखी काही भाग, आंध्र प्रदेशचा काही भाग आणि तामिळनाडूचा बहुतांश भाग, पूर्व-मध्य आणि पश्चिम-मध्य अरबी समुद्राचा आणखी काही भाग, दक्षिण-पश्चिम बंगालचा उपसागर, मध्य-पूर्व बंगालचा उपसागर संपूर्णपणे व उत्तर-पश्चिम बंगालच्या उपसागराच्या काही भागासह ईशान्येकडील मिझोराम आणि मणिपूर या राज्यांच्या काही भागातही मान्सून दाखल झाला आहे.

पुढील ४-५ दिवसांत म्हणजेच पुढील आठवड्याच्या मध्यापर्यंत मान्सून आणखी गती पकडेल. मान्सून संपूर्ण मध्य अरबी समुद्र व्यापून टाकेल. महाराष्ट्राच्या बऱ्याच मोठ्या भागात मान्सूनचा आणखी विस्तार होईल. ज्यामुळे मुंबईसह उत्तर व मध्य महाराष्ट्रात मोसमी पाऊस सक्रिय होण्याची शक्यता आहे.

कर्नाटकचा उर्वरित भाग, तेलंगणा, आंध्र प्रदेश, छत्तीसगड, ओडिशा आणि सिक्कीमच्या काही भागात मान्सून सक्रिय पाऊल टाकेल.

# मराठा समाजाच्या प्रश्नासंदर्भात ना. विखे यांचा पुढाकार कौतुकास्पद

## मनोज जरांगे पाटील यांचेकडून समाधान । मुख्यमंत्री फडणवीस, मंत्री विखे पाटील यांचे मानले आभार

**लोणी । वीरभूमी** –

मराठा समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांच्या अंमलबजावणीसंदर्भात राज्य सरकारने घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांचे स्वागत करत मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच आमदार प्रसाद लाड यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.







जरांगे पाटील म्हणाले की, मराठा समाजाच्या विविध मागण्यांची अंमलबजावणी करून समाजाला न्याय देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय सरकारने घेतला आहे. विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि प्रसाद लाड यांनी यासाठी सकारात्मक भूमिका घेतल्याचे त्यांनी नमूद केले.

ओबीसी समाजाप्रमाणेच मराठा समाजालाही विविध शासकीय सवलती, सारथी संस्थेअंतर्गत योजना तसेच महामंडळाच्या काही बंद पडलेल्या योजना आणि अभ्यासक्रम पुन्हा सुरू करण्याचा शासन निर्णय घेण्यात आल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

आंदोलनादरम्यान बलिदान गेलेल्या कुटुंबांच्या प्रश्नालाही सरकारने गांभीर्याने हाताळल्याचे सांगत, या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राधाकृष्ण विखे पाटील यांनी विशेष पुढाकार घेतल्याचे जरांगे पाटील यांनी म्हटले.

मराठा समाजाच्या मागण्यांना प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंत नेण्यासाठी सरकारच्या वतीने विखे पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस, विखे पाटील, प्रसाद लाड आणि संपूर्ण सरकारचे मी मनापासून आभार मानतो, असेही जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले.

ओबीसी समाजाप्रमाणेच मराठा समाजालाही विविध शासकीय सवलती, सारथी संस्थेअंतर्गत योजना तसेच महामंडळाच्या काही बंद पडलेल्या योजना आणि अभ्यासक्रम पुन्हा सुरू करण्याचा शासन निर्णय घेण्यात आल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. आंदोलनादरम्यान बलिदान दिलेल्या व्यक्तींच्या कुटुंबांच्या प्रश्नांनाही सरकारने गांभीर्याने हाताळल्याचे सांगत, या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राधाकृष्ण विखे पाटील यांनी विशेष पुढाकार घेतला, असा उल्लेख करून मराठा समाजाच्या मागण्यांना प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंत नेण्यासाठी सरकारच्यावतीने विखे पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली, असा उल्लेख मनोज जरांगे पाटील यांनी केला.

> य अंतरवाली सराटी येथे आंदोलना दरम्यान दिलेल्या आश्वासनांची पूर्तता महायुती सरकारने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुरू केली आहे. मराठा समाजाला न्याय देण्याची भूमिका महायुती सरकारने नेहमीच सकारात्मक ठेवली असून भविष्यातही सरकार समाजाला न्याय देण्यासाठी कटिबद्ध असेल. मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या हितासाठी काढण्यात आलेल्या शासन निर्णयातील प्रत्येक योजनेचा लाभ त्यांना मिळावा, यासाठी प्रशासकीय स्तरावर तातडीने कार्यवाही करण्यात येईल.
>
> **– ना. राधाकृष्ण विखे पाटील**

# मराठा विद्यार्थ्यांना 'ओबीसी' प्रमाणे सर्व शैक्षणिक सवलती

**मुंबई । वीरभूमी** –

मराठा समाजाच्या आर्थिक आणि शैक्षणिक प्रगतीला मोठा वेग देण्यासाठी राज्य सरकारने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. मराठा समाजातील विद्यार्थ्यांना आता इतर मागासवर्ग प्रवर्गातील (ओबीसी) विद्यार्थ्यांप्रमाणेच सर्व शैक्षणिक सवलती, सोयी-सुविधा आणि शिष्यवृत्तीचा लाभ देण्याचा निर्णय फडणवीस सरकारने घेतला आहे. या संदर्भातील अधिकृत शासन निर्णय (जीआर) सामान्य प्रशासन विभागाने शुक्रवारी जारी केला असून, यामुळे मराठा समाजातील हजारो विद्यार्थ्यांना उच्च आणि व्यावसायिक शिक्षणासाठी खूप मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे.

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी नुकतेच तीव्र उपोषण आंदोलन केले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार राज्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार प्रसाद लाड यांनी मनोज जरांगे यांची भेट घेऊन, त्यांची यशस्वी समजूत काढत हे उपोषण स्थगित केले होते. त्यावेळी सरकारने जरांगे यांना दिलेल्या विविध आश्वासनांची पूर्तता म्हणून हा महत्त्वपूर्ण जीआर तातडीने काढण्यात आला आहे.

राज्य शासनाने या निर्णयांतर्गत ओबीसी प्रवर्गाच्या धर्तीवर मराठा समाजासाठी तब्बल ८ विशेष योजनांची घोषणा केली आहे, ज्यांची अंमलबजावणी संबंधित प्रशासकीय विभागांमार्फत केली जाईल:

शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना: १० वीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील उच्च शिक्षणासाठी ओबीसी विद्यार्थ्यांना मिळणारी 'शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती' आता मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांनाही दिली जाईल.

प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती: इयत्ता ९ वी ते १२ वीच्या वर्गांमधील विद्यार्थ्यांना लागू असलेली विशेष शिष्यवृत्ती योजना मराठा प्रवर्गासाठीही विस्तारित करण्यात आली आहे.

# SPOT NEWS

## वसुंधरा अकॅडेमीच्या समर्थ महालेची नवोदय विद्यालयासाठी निवड

**● अकोले । वीरभूमी–**



अभिनव शिक्षण संस्था संचलित वसुंधरा अकॅडमीचा इयत्ता ८ वीचा विद्यार्थी समर्थ विलास महाले या विद्यार्थ्यांची नवोदय परीक्षेतून इयत्ता ९ वी प्रवेशासाठी जवाहर नवोदय विद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे निवड झाली आहे. या निवड प्रक्रियेच्या प्रथम फेरीत सुमारे ५०० विद्यार्थ्यांमधून समर्थ महाले याने तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. त्याच्या या उल्लेखनीय यशामुळे वसुंधरा अकॅडेमी तसेच अकोले तालुक्याचे नाव उज्वल झाले आहे. समर्थच्या या यशाबद्दल समर्थ व त्याचे आई-वडील यांचे अभिनव शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकरराव नवले, कोषाध्यक्ष तथा वसुंधरा अकॅडेमीच्या प्राचार्य डॉ. जयश्री देशमुख, सचिव विक्रम नवले, सहसचिव अल्फोन्सा. डी, सर्व संचालक मंडळ, उपप्राचार्य राधिका नवले व वसुंधरा अकॅडमीचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. त्याचबरोबर समर्थला त्याच्या उज्वल भविष्यासाठी मनः पूर्वक शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## इतिहास अभ्यासक भूषण देशमुख यांचे निधन

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**



इतिहास संशोधक, ज्येष्ठ पत्रकार आणि स्नेहालय संस्थेचे संस्थापक सदस्य भूषण गोपाळ देशमुख (वय ६३) यांचे शनिवारी दुपारी येथील रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्यामागे आई, पत्नी ज्योती, मुलगा मोहित, दोन बहिणी, सून असा परिवार आहे. शनिवारी सायंकाळी येथील स्मशानभूमीत त्यांचे पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. गुजरातमधील अहमदाबाद येथे ७ जुलै १९६३ रोजी जन्मलेल्या देशमुख यांचे पितृछत्र १९७१ मध्ये हरपले. त्यानंतर, आजोळी जामखेड येथे त्यांचे शालेय शिक्षण झाले. त्यांनी पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालय आणि त्यानंतर अभियांत्रिकी महाविद्यालयातून टेक्स्टाइल इंजिनीअरिंगचे शिक्षण पूर्ण केले. कापडांच्या मिल्समध्ये अल्पकाळ काम करून माध्यम क्षेत्रात ते कार्यरत झाले. काही दिवस सोलापूरला पत्रकारिता केल्यानंतर त्यांनी अहिल्यानगर शहरातही पत्रकारिता केली. त्यांना मनपाने जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविले. ऐतिहासिक वास्तू संग्रहालयावर ते विश्वस्त होते, तसेच भुईकोट किल्ला सुशोभीकरण समितीवरही ते सदस्य होते. शहर व इतिहासाच्या संस्कृतीबद्दल त्यांचा गाढा व्यासंग होता. गत ५ वर्षे दर रविवारी नगरमधील, तसेच बाहेरून येणाऱ्या पर्यटकांसाठी ते हेरिटेज वॉकच्या माध्यमातून विनामूल्य नगर परिसरातील सर्व ऐतिहासिक ठिकाणे दाखवत आणि त्यांची माहिती देत. नगरचा ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी ते सातत्याने प्रबोधन करत होते. स्नेहालय संस्थेत व स्नेहालच्या रेडिओ नगरमध्येही त्यांनी मोठे योगदान दिले. पर्यटकांना भुईकोट किल्ला दाखवत असताना त्यांना सर्पदंश झाला होता. त्यामुळे दीड महिना ते आजाराशी झुंज देत होते.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पाथर्डीत वृक्षारोपण उत्साहात

### प्रत्येक नागरिकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे : नगराध्यक्ष अभय आव्हाड

**● पाथर्डी । वीरभूमी –**

निसर्गाचे संवर्धन झाले आणि पर्यावरणाचा समतोल राखला गेला तरच पृथ्वीचे अस्तित्व टिकून राहील. अन्यथा भविष्यात मानवाला दुष्काळ, प्रदूषण आणि वाढते तापमान यांसारख्या गंभीर संकटांना सामोरे जावे लागेल. प्रत्येक नागरिकाने दरवर्षी किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा. वृक्ष केवळ ऑक्सिजन देत नाहीत, तर भावी पिढ्यांसाठी समृद्ध आणि निरोगी पर्यावरण निर्माण करतात. निसर्ग संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी केले.



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पाथर्डी नगरपरिषद व वन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील प्रभाग क्रमांक ८ मधील एडके कॉलनी परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

यावेळी नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपनगराध्यक्षा मंगल कोकाटे, नगरसेवक प्रतिक भैय्या नांगरे तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी मिलिंद गोवेकर यांच्या हस्ते विविध देशी वृक्षांची लागवड करण्यात आली.

कार्यक्रमास ज्येष्ठ नगरसेवक नंदकुमार शेळके, माजी उपनगराध्यक्षा मनीषा उदमले, नगरसेवक संजय देशमुख, सभापती बंडूशेठ बोरुडे, वंदना टेके, सुभाष बोरुडे, संदीप पवार, सिंधू साठे, संतोष एडके, वन विभागाचे बबन मंचरे, विजय पालवे, आप्पासाहेब घनवट यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

प्रभागातील रस्त्यांच्या दुतर्फा तसेच मोकळ्या जागांमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी मिलिंद गोवेकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत वृक्षारोपण, निसर्ग संवर्धन आणि पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व विशद केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नगरसेविका मनीषा उदमले यांनी उपस्थितांचे स्वागत केले, तर नगरसेवक प्रतिक नांगरे यांनी आभार मानले.

## कासार पिंपळगाव येथे 'शिवराज्याभिषेक दिन' उत्साहात साजरा



**● पाथर्डी । वीरभूमी–**

तालुक्यातील कासार पिंपळगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यभिषेक दिनानिमित्त गावातील विठ्ठल-रुख्मिणी मंदिरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सिंहासनास्थ मूर्तीचे पुजन करुन 'शिवराज्याभिषेक' सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी छत्रपतींच्या जयघोषाने संपुर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

कासार पिंपळगाव येथील विठ्ठल-रुख्मिणी मंदिरात विराजमान असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीचे 'शिवराज्याभिषेक' दिनानिमित्त कारभारी राजळे, गोरख राजळे, माजी सैनिक नारायण भगत, विठोबा जगताप यांच्या हस्ते पुजन करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य आप्पासाहेब राजळे, अंकुश राजळे, योगेश राजळे, नितीन साखरे, योगेश नजन, प्रांजल साखरे, संतोष शेळके, अनंत राजळे, शरद म्हस्के आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## श्रीगोंद्यात शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात

### शिवचरित्र, स्वराज्य व राष्ट्रनिष्ठेचा दिला संदेश

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेड पक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीगोंदा शहरातील शनी चौक येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त प्रथमच भव्य शिवराज्याभिषेक सोहळ्याचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. भक्तिमय वातावरणात आणि शिवमय जल्लोषात पार पडलेल्या या सोहळ्यास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीला विधिवत अभिषेक करून शिवराज्याभिषेक सोहळ्याची सुरुवात करण्यात आली. संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष शामभाऊ जरे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते. मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष प्रा. सुनील गायकवाड यांनी प्रास्ताविकातून शिवराज्याभिषेकाचे ऐतिहासिक महत्त्व विशद करत स्वराज्य संकल्पनेचा इतिहास उलगडून सांगितला. यावेळी ह.भ.प. संपत महाराज लांडगे यांच्या हस्ते विधिवत राज्याभिषेक पूजा संपन्न झाली. तसेच संभाजी ब्रिगेडचे तालुका उपाध्यक्ष दिलीप लबडे व त्यांच्या धर्मपत्नी यांनी सपत्नीक पूजाविधी करून छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले.

सोहळ्यात व्याख्याते महेंद्र मिसाळ, प्रा. खरसडे आणि प्रा. सचिन झगडे यांनी उपस्थितांना शिवचरित्र, शिवविचार, स्वराज्याची संकल्पना आणि आजच्या काळातील त्याचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. वक्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य हे केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून सामाजिक एकता, राष्ट्रनिष्ठा आणि स्वाभिमानाची प्रेरणा असल्याचे सांगितले.

कार्यक्रमास छत्रपती संभाजी महाराज सेवा समितीचे जिल्हा उपाध्यक्ष आनंद लगड, माजी नगराध्यक्ष मनोहर पोटे, संभाजी ब्रिगेडचे संतोष आरडे, घनश्याम काळे, दीपक मखरे यांच्यासह विविध सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# आर्थिक साक्षरता काळाची गरज; घराघरात आर्थिक विषयांवर चर्चा व्हावी

### राजेश देशपांडे । वृद्धेश्वर अर्बन मल्टिस्टेटच्या १३ व्या वर्धापन दिनानिमित्त आर्थिक सुरक्षा व ग्राहक जागरूकता मेळावा उत्साहात

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

देशात डॉक्टर, अभियंता, सीए यांसारख्या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांची उपलब्धता असली तरी सक्षम गुंतवणूकदार घडविण्यासाठी स्वतंत्र शिक्षण व्यवस्था नसल्याने अनेक नागरिक जास्त परताव्याच्या आमिषाला बळी पडून आर्थिक फसवणुकीचे शिकार होतात. हे चित्र बदलण्यासाठी घराघरात आर्थिक विषयांवर खुली चर्चा होणे आणि नियमित वृत्तपत्र वाचनाची सवय लागणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन देशपांडे इन्व्हेस्टमेंटचे संचालक तथा आर्थिक कौशल्य विकास अभियानाचे समन्वयक राजेश देशपांडे यांनी केले.




वृद्धेश्वर अर्बन मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या १३ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित 'आर्थिक सुरक्षा व ग्राहक जागरूकता मेळावा' तसेच दहावी-बारावी परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्यात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा सौ. सुनीता खेतमाळीस होत्या.

यावेळी राजेश देशपांडे म्हणाले की, झटपट श्रीमंत होण्याचा कोणताही शॉर्टकट नसतो. रिझर्व्ह बँक तसेच विविध वित्तीय नियामक संस्थांकडून सातत्याने जनजागृती केली जात असतानाही अनेक गुंतवणूकदार आकर्षक परताव्याच्या आमिषाला बळी पडतात. ही समस्या केवळ भारतापुरती मर्यादित नसून जागतिक स्तरावरही गंभीर स्वरूप धारण करत आहे. जीवनात पैशाचे महत्त्व अनन्यसाधारण असून बचतीची सवय प्रत्येकाने अंगीकारली पाहिजे. आपल्या पैशाची गुंतवणूक नेमकी कुठे आणि कशासाठी केली जात आहे, याची माहिती नागरिकांनी घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच आर्थिक साक्षरतेसाठी शालेय स्तरापासूनच मार्गदर्शनाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी वृद्धेश्वर अर्बन मल्टिस्टेटच्या चेअरमन सौ. सायली वाडगे यांनी संस्थेच्या स्थापनेपासूनचा प्रवास उलगडून सांगितला. त्या म्हणाल्या की, संस्थापक विठ्ठलराव वाडगे यांनी एका मित्राला उपचारासाठी आर्थिक अडचणींचा सामना करताना पाहिले. त्यातूनच सामान्य व गरजू नागरिकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने वृद्धेश्वर मल्टिस्टेटची स्थापना करण्यात आली. गेल्या १३ वर्षांत संस्थेने १३ शाखांचे जाळे उभे केले असून महिला बचत गट, खाजगी कृषी उत्पन्न बाजार समिती तसेच गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत अशा विविध सामाजिक उपक्रमांमुळे संस्था लोकांच्या विश्वासास पात्र ठरली आहे. भविष्यात ग्राहकांना अधिकाधिक सुविधा देण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.

राजेश देशपांडे यांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, गरिबांना केंद्रस्थानी ठेवून काम केल्यामुळेच वृद्धेश्वर अर्बन मल्टिस्टेटने उल्लेखनीय प्रगती साधली आहे. संस्थापक विठ्ठलराव वाडगे यांनी सामाजिक बांधिलकी जपत उभी केलेली ही संस्था इतरांसाठी आदर्शवत असल्याचे त्यांनी नमूद केले. अशा प्रकारच्या अधिक संस्था राज्यभर उभ्या राहिल्यास राज्याच्या आर्थिक विकासाला निश्चितच चालना मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात ठेवीदारांसाठी प्रोत्साहनपर भेटवस्तूंची लॉटरी काढण्यात आली. यामध्ये निकेश काटे यांना चांदीचे नाणे, किसन सप्रे यांना पॉवर बँक तर मनीषा वाल्हेकर यांना इलेक्ट्रिक किटली प्रदान करण्यात आली. तसेच दहावीच्या बोर्ड परीक्षेत ९८.२० टक्के गुण मिळवून तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या पूर्वा युवराज रणसिंग हिच्यासह विविध गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनी व त्यांच्या पालकांचा सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी उपनगराध्यक्षा सौ. अलका दरेकर, नगरसेविका चांदणी खेतमाळीस, नगरसेवक सुशीलकुमार शिंदे, अमीन शेख, शहाजी खेतमाळीस, चैतन्य महिला बचत गटांच्या सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन सौ. रुक्मिणीताई वाडगे, शुभम वाडगे, सौ. मेघना गावडे, संचालक वामन खाडे यांच्यासह ठेवीदार, ग्राहक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन चेतन गायकवाड यांनी केले, तर सोपान गायकवाड यांनी आभार मानले.

## संपत दसपुते यांनी विद्यालयाच्या प्राचार्यपदाचा पदभार वटवृक्षारोपणाने स्वीकारला



**● शेवगाव । वीरभूमी–**

पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज असून प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावावे. वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनाची जबाबदारीही स्वीकारली पाहिजे, असे प्रतिपादन नवनियुक्त प्राचार्य संपत दसपुते यांनी केले.

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून विद्यालयात वटवृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपमुख्याध्यापक सुनील जायभाये, पर्यवेक्षक संजय दुधाडे, नानासाहेब थोटे, गणेश तेलोरे, विठ्ठल भिसे, मीना बटुळे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नवनियुक्त प्राचार्य संपत दसपुते, उपमुख्याध्यापक सुनील जायभाये आणि पर्यवेक्षक संजय दुधाडे यांचा शिक्षक व पालकांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यानंतर विद्यालयाच्या क्रीडांगण परिसरात मान्यवरांच्या हस्ते पाच वटवृक्षांची लागवड करण्यात आली.

यावेळी बोलताना प्राचार्य संपत दसपुते म्हणाले की, वृक्ष पर्यावरणाचे संतुलन राखण्यास, प्रदूषण कमी करण्यास तसेच भावी पिढ्यांना शुद्ध हवा आणि निरोगी जीवन देण्यास महत्त्वाची भूमिका बजावतात. प्रत्येक विद्यार्थ्याने वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारून पर्यावरण रक्षणासाठी योगदान द्यावे, असा मौलिक संदेश त्यांनी दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सर्जेराव निकाळजे यांनी केले, तर ज्ञानेश्वर तहकीक यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंदांचे सहकार्य लाभले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

## SPOT NEWS

### अतिक्रमणाची तक्रार केल्याने कारवर दगडफेक; चार जणांवर गुन्हा दाखल

**अहिल्यानगर । वीरभूमी–**
सावेडी परिसरातील नगर–मनमाड रोडवर अतिक्रमणाची तक्रार केल्याने एका किराणा दुकानदाराची कार अडवून त्यावर पाठीमागून दगडफेक केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात सावेडीतील चार जणांविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. संतोष नामदेव वाकळे (वय ३३, रा. वाकळे मळा, बालिकाश्रम रोड, सावेडी) यांनी यासंदर्भात तोफखाना पोलीस ठाण्यात रीतसर फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून सोपान भगवान वाकळे, किशोर भगवान वाकळे, प्रसाद सुरेश वाकळे (तिघे रा. अर्जुन वॉशिंग सेंटर शेजारी, सावेडी) आणि केतन ठाणगे (रा. तपोवन रोड, सावेडी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी संतोष वाकळे यांचे सावेडी येथील आरोग्य सदन हॉस्पिटलसमोर किराणा दुकान आहे. त्यांचे चुलत भाऊ सोपान वाकळे आणि किशोर वाकळे यांच्याशी गेल्या पाच वर्षांपासून जमिनीच्या जागेवरून वाद सुरू आहे. त्यांनी महानगरपालिकेत अतिक्रमणाची तक्रार केल्याने आरोपींनी फिर्यादीला मानसिक व शारीरिक त्रास देण्याच्या उद्देशाने हे कृत्य केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. ता. २१ मे २०२६ रोजी रात्री ९:०० वाजण्याच्या सुमारास संतोष वाकळे हे आपले किराणा दुकान बंद करून त्यांच्या महिंद्रा मराझो कार (क्र. MH-16-BZ-7143) घरी जात होते. नगर–मनमाड रोडवरील सत्यम कॉम्प्लेक्सजवळ आले असता, आरोपी सोपान वाकळे याने गाडी अडवण्यासाठी रस्त्याच्या मधोमध उभे राहून हात केला. मात्र, फिर्यादीने गाडी न थांबवता पुढे नेली. याचा राग आल्याने सोपान याने गाडीच्या काचेवर हाताने मारले आणि गाडी पुढे गेल्यानंतर मागून जाणीवपूर्वक दगड फेकून मारला, ज्यामुळे कारचे नुकसान झाले. त्याच वेळी थोडे पुढे किशोर वाकळे आणि प्रसाद वाकळे हे त्यांच्या मोपेड व इलेक्ट्रिक मोटरसायकलसह रस्त्याच्या बाजूला दबा धरून थांबले होते. फिर्यादीने तेथून कशीबशी आपली कार काढत घर गाठले. फिर्यादीत नमूद केल्यानुसार, या घटनेच्या आदल्या दिवशी म्हणजेच २० मे २०२६ रोजी देखील सोपान वाकळे, किशोर वाकळे आणि केतन ठाणगे यांनी फिर्यादीचा रस्ता अडवण्याचा प्रयत्न करून गाडीवर मागून दगडफेक केली होती. या तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांद्वारे गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल गोपीनाथ गोरडे करत आहेत.

### पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या महिला जिल्हाध्यक्षपदी लतिका पवार

**अहिल्यानगर । वीरभूमी–**
पर्यावरण संरक्षण, वृक्षसंवर्धन आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या लतिका नंदकुमार पवार यांची निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ (महाराष्ट्र राज्य) यांच्या महिला जिल्हाध्यक्षपदी फेरनियुक्ती करण्यात आली आहे. संस्थेचे राज्याध्यक्ष प्रमोद मोरे यांनी त्यांच्या पर्यावरण विषयक जनजागृती, वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन क्षेत्रातील सातत्यपूर्ण योगदानाची दखल घेत ही नियुक्ती जाहीर केली. सन २०२३ ते २०२५ या कालावधीत त्यांनी केलेल्या प्रभावी कार्याचा गौरव म्हणून त्यांच्यावर पुन्हा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. त्यांचा नवीन कार्यकाळ २०२६ ते २०२९ या तीन वर्षांसाठी असणार असून, या काळात पर्यावरण संवर्धनासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम, जनजागृती मोहिमा आणि सामाजिक सहभाग वाढविणाऱ्या योजना राबविण्याचा त्यांचा मानस आहे. लतिका पवार यांनी पर्यावरण संरक्षणासाठी केवळ वृक्षारोपण करून चालणार नाही, तर लावलेली झाडे जगविणे आणि त्यांचे संवर्धन करणे अधिक महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

# संजीवनी युवा प्रतिष्ठान नोकरी मेळाव्यातुन रोजगाराला चालना

## रेणुकाताई कोल्हे । संजीवनी युवा प्रतिष्ठानच्यावतीने नोकरी मेळाव्याचे आयोजन

**कोपरगाव । वीरभूमी–**
आमदार विवेक कोल्हे यांनी युवा, पर्यावरण, कृषी, सामाजिक आणि आरोग्य सेवेचा वसा घेत संजीवनी युवा प्रतिष्ठानची स्थापना करत सामाजिक सेवेचा कार्यारंभ केला त्यातुन या परिसरातील सुशिक्षीत बेरोजगारांच्या रोजगाराला चालना मिळावी म्हणुन प्रतिष्ठानमार्फत नोकरी मेळाव्याचे आयोजन दरवर्षी केले जाते असे प्रतिपादन कोपरगांव तालुका स्वयंसहायता महिला बचतगटाच्या अध्यक्षा सौ. रेणुकाताई विवेक कोल्हे यांनी केले. प्रत्येकांने प्रामाणिकता जोपासावी त्यातुन यश ध्येय सहज गाठता येते असेही त्या म्हणाल्या.




कोपरगाव तालुक्यातील शिंगणापुर येथील सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर सालाबादप्रमाणे याही वर्षी शनिवारी संजीवनी युवा प्रतिष्ठानच्यावतीने नोकरी मेळाव्याचे आयोजन करण्यांत आले होते त्याचे उदघाटन करतांना त्या अध्यक्षपदावरून बोलत होत्या. प्रारंभी माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यांत आले. कारखान्याचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर पजरणे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. एच. आर. मॅनेजर विशाल वाजपेयी यांनी संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार क्षेत्रात सुरू असलेल्या उल्लेखनीय योगदानाची माहिती देत कारखान्याच्या प्रगतीचा आढावा सादर केला. यावेळी नोकरी महोत्सवामध्ये कोपरगाव तालुक्यातील विविध ग्रामीण भागातील कान्याकोपऱ्यातून आलेल्या तब्बल ५०० हून अधिक युवक युवतींनी सहभाग घेतला. याप्रसंगी ॲप्टीव कॉम्पोनंट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, गरवारे हायटेक फिल्मस, ईपीटॉम कंपोनंट्स प्रायव्हेट लिमिटेड, रुरलशोर्स बिझनेस सर्विस प्रायव्हेट लिमिटेड–संजीवनी कॉल सेंटर, कायनेटिक इंजिनिअरिंग लिमिटेड आदीसह मल्टिनॅशनल कंपन्या या नोकरी महोत्सवात सहभागी झाल्या होत्या.

सौ. रेणुकाताई कोल्हे पुढे म्हणाल्या की, तालुक्यातील महिलांना बचतगटाच्या माध्यमातुन पाठबळ देण्यांसाठी माजी आमदार सौ. स्नेहलता कोल्हे यांनी मोठे काम उभे केले आहे. ग्रामिण भागातील मुला मुलींना रोजगाराच्या संधी मिळाव्या त्यांच्यातील स्कील वाढीस लागावे, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कंपन्यात काम मिळविण्यांसाठी यशस्वी मुलाखतीचे तंत्र कसे आत्मसात करावयाचे याची शिकवणही संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या माध्यमांतुन येथील सुशिक्षीत बेजरोजगारांना दिले जाते. आज बदलत्या मुक्त अर्थव्यवस्थेत प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा निर्माण झाली आहे, त्या स्पर्धेत कोपरगांव पंचक्रोशीबरोबरच अहिल्यानगर जिल्हयातील प्रत्येक युवक पुढे जावा या उद्देशाने हा नौकरी मेळावा भरवला जातो. सुशिक्षीत बेरोजगारांच्या माता–पित्यांचे स्वप्न पुर्ण व्हावे, रोजगारातुन अर्थप्राप्ती व्हावी व घरदार पुढे चालावे या प्रामाणिक हेतुने संजीवनी युवा प्रतिष्ठानचा नौकरी मेळावा आगळा–वेगळा ठरावा हिच अपेक्षा यातुन वाढीस लागावी असेही त्या शेवटी म्हणाल्या.

## तहसील कार्यालयात उद्या सोमवारी आ. आशुतोष काळेंचा जनता दरबार



**कोपरगाव । वीरभूमी–**
मतदार संघातील नागरीकांना शासकीय कार्यालयात येणाऱ्या अडचणी जनता दरबाराच्या माध्यमातून आ. आशुतोष काळे यांनी सोडविल्या आहेत. हि जनता दरबाराची परंपरा अविरतपणे सुरु ठेवून पंचायत समितीच्या सर्व विभागात नागरीकांना येणाऱ्या अडचणी व समस्या सोडविण्यासाठी सोमवार (दि.०८) रोजी दुपारी ०३:०० वा. कोपरगाव तहसील कार्यालयात आमदार आशुतोष काळे जनता दरबार घेणार आहेत. अशी माहिती आ.आशुतोष काळे यांच्या जनसंपर्क कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

मतदार संघातील बहुसंख्य नागरिकांचे अनेक शासकीय कार्यालयात विविध प्रकारची कामे असतात. त्या कामांचा पाठपुरावा करण्यासाठी सर्वसामान्य नागरिक, अपंग व्यक्ती, विधवा महिला, जेष्ठ नागरिक, माजी सैनिक, शेतकरी अशा सर्वच स्तरातील सर्वसामान्य नागरिकांना विविध शासकीय कार्यालयात कामानिमित्ताने ये–जा असते. सर्व शासकीय कार्यालयात मतदार संघातील नागरिकांची असलेली कामे विना अडथळा लवकरात लवकर व्हावीत.यासाठी नागरीकांना येणाऱ्या अडी–अडचणी समजून घेवून या अडीअडचणी विविध शासकीय कार्यालयांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसमवेत एकाचवेळी चर्चा घडवून ते प्रश्न तातडीने सुटावे यासाठी आ.आशुतोष काळे जनता दरबार घेत आहेत.

ज्या नागरीकांच्या पंचायत समितीच्या बाबतीत अडचणी आहेत अशा नागरिकांनी सोमवार (दि.०८) रोजी दुपारी ०३:०० वा. कोपरगाव तहसील कार्यालयात उपस्थित राहून आपल्या अडचणी व तक्रारी लेखी स्वरूपात मांडाव्या. जेणेकरून कमी वेळात जास्तीत जास्त नागरिकांचे प्रश्न सुटले जातील. त्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन आ.आशुतोष काळे यांच्या जनसंपर्क कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

## कासार पिंपळगाव येथे आ. मोनिकाताई राजळेंच्या हस्ते वृक्षारोपण करुन ‘एक पेड़ माँ के नाम’ उपक्रम उत्साहात



**पाथर्डी । वीरभूमी–**
जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कासार पिंपळगाव येथे आ. मोनिकाताई राजळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करुन ‘एक पेड़ माँ के नाम’ हा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. यावेळी प्रत्येकाने आपल्या आईच्या नावाने वृक्ष लागवड व वृक्षसंवर्धन करुन पर्यावरण समतोल राखण्याचा संदेश देण्यात आला.

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून कासार पिंपळगाव ग्रामपंचायतीच्यावतीने ‘एक पेड माँ के नाम’ उपक्रम राबविण्यात आला. निसर्गाचा समतोल राखत पर्यावरणाचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात आमदार मोनिकाताई राजळे यांनी स्वतः सहभाग घेत वृक्षारोपण केले. यावेळी त्यांनी पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकाने वृक्ष लागवड करून त्यांचे संगोपन करण्याचे आवाहन केले.

या प्रसंगी सरपंच मोनालीताई राजळे, उपसरपंच आशाताई तिजोरे, सेवा संस्थेचे व्हा. चेअरमन संभाजी राजळे, ज्येष्ठ नेते सोपान तुपे, भाऊपाटील राजळे, शिवाजी भगत, द्वारकानाथ म्हस्के, गोरख राजळे, संदीप राजळे, नवनाथ तिजोरे, ॲड. सुनील राजळे, अंकुश राजळे, आप्पासाहेब राजळे, योगिता भगत, राम राजळे, सुखदेव म्हस्के, महादेव शेळके, नारायण भगत, दादासाहेब पवार, उमेश तिजोरे, हरिभाऊ तिजोरे, अनंत राजळे, नितीन साखरे, संतोष शेळके, अमित भगत, विलास भगत, विस्तार अधिकारी श्री. गिऱ्हे, ग्रामपंचायत अधिकारी प्रमोद म्हस्के, योगेश नजन, राऊत, भाऊसाहेब शेळके, भिमा भगत, श्री. काळे, संतोष शेरकर, अनिल तिजोरे, अंगणवाडी सेविका, प्राथमिक शिक्षक, शिक्षीका, ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

या उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, पर्यावरण रक्षणासाठी सामूहिक सहभागाची गरज अधोरेखित करण्यात आली. वृक्ष लागवडीसोबतच त्यांचे संवर्धन करण्याचा संकल्पही उपस्थितांनी यावेळी व्यक्त केला.

# श्रीरामपूरमधून अपहार झालेला सोयाबीन बियाण्यांनी भरलेला ट्रक जप्त

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई । तब्बल ३० लाख ३९ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

**श्रीरामपूर । वीरभूमी–**
श्रीरामपूर येथून अपहार करण्यात आलेला सोयाबीन बियाण्यांनी भरलेला आयशर ट्रक स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शोधून काढत तब्बल ३० लाख ३९ हजार ६४८ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

याबाबतची माहिती अशी की, दि. २९ मे २०२६ रोजी दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास दत्तनगर येथील गजानन रोडवेज ट्रान्सपोर्ट, श्रीरामपूर येथून फिर्यादीच्या भावाच्या मालकीची आयशर कंपनीची ट्रक (क्रमांक एमएच–१२ व्हीएफ–६९११) चालक जयसिंग मुक्ताजी भगत (रा. खानापूर, ता. जुन्नर, जि. पुणे) याच्या ताब्यात देण्यात आली होती. मात्र, चालकाने विश्वासघात करून ट्रकसह मालाचा अपहार केल्याची घटना घडली.

या प्रकरणी फिर्यादी प्रदीप शिवनारायण भट्टड (रा. स्वस्तिक चौक, प्रगती शाळेजवळ, राहुरी, जि. अहिल्यानगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ५२१/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ च्या कलम ३१६(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक संदीप मुरकुटे तसेच पोलीस अंमलदार रिचर्ड गायकवाड, भगवान थोरात, रमीजराजा आतार आणि विशाल तनपुरे यांचे विशेष पथक तयार करण्यात आले. आरोपी व मुद्देमालाचा शोध घेण्यासाठी पथकाला आवश्यक सूचना व मार्गदर्शन करून रवाना करण्यात आले होते.

तपासादरम्यान संबंधित आयशर ट्रक राजगुरूनगर (ता. खेड, जि. पुणे) येथील मार्केट यार्ड परिसरात उभा असल्याची खात्रीशीर माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार तात्काळ कारवाई करत पोलिसांनी सदर ठिकाणी छापा टाकून ट्रक ताब्यात घेतला.

या कारवाईत १५ लाख रुपये किमतीचा आयशर ट्रक तसेच १५ लाख ३९ हजार ६४८ रुपये किमतीचे महाबीज कंपनीचे सोयाबीन बियाणे असा एकूण ३० लाख ३९ हजार ६४८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



जप्त करण्यात आलेला मुद्देमाल पुढील तपासासाठी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात जमा करण्यात आला असून, या प्रकरणाचा पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करत आहेत. ही कारवाई मुम्मका सुदर्शन, पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# बेनवडीतील समाधी शिलालेखातून भगवद्गीतेचा संदेश उजेडात

## भगवद्गीतेच्या अंतिम श्लोकासह 'श्री लक्ष्मी नृसिंह समाधी'चा उल्लेख; मराठाकालीन धार्मिक व सांस्कृतिक जीवनाचा महत्त्वपूर्ण पुरावा

■ विजय उंडे

• **श्रीगोंदा । वीरभूमी** – अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील मौजे बेनवडी येथील प्रसिद्ध श्री हरिनारायण स्वामी मंदिर परिसरात आढळून आलेल्या समाधी शिलालेखामुळे स्थानिक संतपरंपरा, वैष्णव भक्तीसंप्रदाय आणि भगवद्गीतेच्या प्रभावाचा महत्त्वपूर्ण ऐतिहासिक पुरावा समोर आला आहे.

मंदिराच्या मुख्य तटबंदी प्रवेशद्वारासमोरील समाधीस्थळांवर कोरलेला हा शिलालेख मराठा कालखंडातील धार्मिक व सामाजिक जीवनाच्या अभ्यासासाठी महत्त्वाचा दस्तऐवज मानला जात आहे.

मंदिरासमोर एकूण पाच वृंदावन समाधीस्थळे असून, त्यापैकी पहिल्या समाधीवर हा शिलालेख कोरलेला आहे. सदर लेख उठाव स्वरूपातील असून पाच ओळींमध्ये देवनागरी लिपीत संस्कृत भाषेत कोरण्यात आला आहे. अनेक वर्षे उघड्यावर असल्याने वातावरणाच्या परिणामामुळे काही अक्षरे झिजलेली व पुसट झालेली दिसून येतात. मात्र, शिलालेखाचा छाप घेतल्यानंतर त्यावरील मजकूर स्पष्टपणे वाचण्यात संशोधकांना यश आले.

**शिलालेखाचे वाचन :**

*१।। श्री ।।*

*२।। यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।।*

*३।। तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।।१।।*

*४।। श्री हरी नारायण समर्थ ।।*

*५।। श्री लक्ष्मी नृसिंह समाधी ।।*

सदर श्लोक हा भगवद्गीतेच्या अठराव्या अध्यायातील अंतिम संदेश मानला जातो. जिथे योगेश्वर श्रीकृष्ण आणि धनुर्धारी अर्जुन आहेत, तिथे श्री, विजय, ऐश्वर्य आणि नीती निश्चित असते, असा या श्लोकाचा अर्थ आहे. समाधीस्थळी हा श्लोक कोरण्यामागे समाधिस्थ महात्म्याचे जीवन गीतेच्या तत्त्वांनुसार व्यतीत झाले, असा संदेश देण्याचा उद्देश असल्याचे संशोधकांचे मत आहे.





या शिलालेखात श्री हरी नारायण समर्थ तसेच श्री लक्ष्मी नृसिंह समाधी असा उल्लेख आढळून येतो. त्यामुळे वैष्णव भक्तिपरंपरा, लक्ष्मी–नृसिंह उपासना आणि संतपरंपरेचा प्रभाव या भागात दृढपणे रुजलेला असल्याचे स्पष्ट होते. इतिहास अभ्यासासाठी हा महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे.

संशोधकांच्या मते, हा शिलालेख दाखवून देतो की भगवद्गीतेचे तत्त्वज्ञान केवळ धार्मिक ग्रंथापुरते मर्यादित न राहता लोकजीवन, संतपरंपरा आणि स्मृतिस्थळांमध्येही खोलवर रुजलेले होते. समाधीसारख्या स्मारकांवर गीतेतील श्लोक कोरण्याची परंपरा ही तत्कालीन समाजातील धार्मिक विचारसरणी आणि नैतिक मूल्यांचे प्रतीक मानली जाते.

अनेक स्थानिक संतपरंपरा लिखित इतिहासात आढळून येत नाहीत; मात्र अशा शिलालेखांमुळे त्या इतिहासाच्या प्रकाशात येतात. त्यामुळे हा शिलालेख स्थानिक इतिहास, धर्मपरंपरा आणि मराठाकालीन सांस्कृतिक जीवनाच्या अभ्यासासाठी अत्यंत महत्त्वाचा स्रोत ठरत आहे.

सदर शिलालेखाचे वाचन ऐतिहासिक शिलालेखक वाचक अनिल किसन दुधाणे यांनी केले असून संशोधन कार्य राजेश पोपट इंगळे यांनी केले आहे. तसेच शिलालेखाचा छाप घेण्यासाठी दिगंबर भुजबळ, सचिन भोसले आणि देशपांडे परिवार यांचे सहकार्य लाभले. शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन संचलित शिवदुर्ग वारसा संवर्धन समितीने हा ऐतिहासिक वारसा उजेडात आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत.

# श्रीगोंद्यात स्वतंत्र उत्पादन शुल्क कार्यालय करावे

## टिळक भोस यांची मागणी । १६ जूनला मुंबईत आंदोलनाचा इशारा

• **श्रीगोंदा । वीरभूमी**– अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यात वाढत्या अवैध दारू विक्री, हातभट्टी, मद्यतस्करी आणि बेकायदेशीर मद्य व्यवसायावर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी श्रीगोंदा येथे स्वतंत्र राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय तात्काळ सुरू करण्यात यावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. या मागणीसाठी स्वराज्य जनजागृती परिषद, अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष टिळक भोस यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला असून, मागणी मान्य न झाल्यास १६ जून २०२६ रोजी मुंबई येथे राज्य उत्पादन शुल्क आयुक्त कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे.



श्री. भोस यांनी दिलेल्या माहितीनुसार, श्रीगोंदा, कर्जत आणि जामखेड या तीन तालुक्यांचा कार्यभार सध्या अहिल्यानगर येथील उत्पादन शुल्क कार्यालयाकडून पाहिला जात आहे. मात्र मोठे भौगोलिक अंतर, अपुरे मनुष्यबळ आणि स्थानिक स्तरावर स्वतंत्र यंत्रणा नसल्यामुळे अवैध दारू व्यवसायावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यात अडचणी निर्माण होत आहेत. परिणामी ग्रामीण भागात हातभट्टी, बेकायदेशीर मद्यविक्री आणि तस्करीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची तक्रार नागरिकांकडून वारंवार केली जात आहे.

या संदर्भात यापूर्वी ८ एप्रिल २०२५ रोजी अहिल्यानगर येथे लेखी निवेदन देण्यात आले होते. त्यानंतर ५ ऑगस्ट २०२६ रोजी अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क कार्यालयासमोर ठिय्या आंदोलनही करण्यात आले होते. तसेच अनेक वेळा लेखी पाठपुरावा करूनही अद्याप ठोस निर्णय झालेला नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

टिळक भोस यांनी स्वतः मुंबई येथे जाऊन राज्य उत्पादन शुल्क आयुक्त कार्यालय तसेच उपमुख्यमंत्री कार्यालयात निवेदन सादर केले असून, शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी केली आहे.

श्री. भोस यांनी निवेदनात म्हटले आहे की, शासनाच्या धोरणानुसार नवीन कार्यालयासाठी आवश्यक पदरचना उपलब्ध असतानाही कार्यालय सुरू करण्यात होत असलेला विलंब जनहिताला बाधा आणणारा आहे. वाढत्या अवैध मद्यविक्रीमुळे युवकांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढत असून, ग्रामीण भागातील गुन्हेगारी आणि सामाजिक समस्या अधिक गंभीर होत आहेत. याशिवाय शासनाच्या महसुलाचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, राज्य उत्पादन शुल्क विभागाला राज्यभरातून मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त होत असतानाही मागील दोन वर्षांत मंजूर झालेली अनेक नवीन कार्यालये अद्याप सुरू झालेली नाहीत. त्यामुळे स्थानिक पातळीवर प्रशासनाची कार्यक्षमता वाढवण्यासाठी स्वतंत्र कार्यालयांची आवश्यकता असल्याचे मत नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

श्रीगोंदा येथे तातडीने स्वतंत्र कार्यालय सुरू करावे. आवश्यक असल्यास शासनाने जागा खरेदी करून कार्यालय उभारावे अथवा भाड्याने जागा घेऊन कामकाज सुरू करावे. अन्यथा १६ जून रोजी मुंबई येथे लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा टिळक भोस यांनी दिला आहे.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त एस. एस. जी. एम. महाविद्यालयात वृक्षारोपण



• **कोपरगाव । वीरभूमी**– जागतिक पर्यावरण दिनानिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या श्री सद्गुरु गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स महाविद्यालय, कोपरगाव येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण आणि हरित परिसर निर्मितीचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माधव सरोदे व उपस्थितांनी वृक्षारोपण केले.

या उपक्रमात कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. बंडेराव तऱ्हाळ, विज्ञान शाखेचे उपप्राचार्य डॉ. घनश्याम भगत, वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य डॉ. अर्जुन भागवत, प्रा. डॉ.चंद्रभान चौधरी, डॉ. संतोष पवार, डॉ. देविदास रणधीर, डॉ. बी. एम. वाघमोडे, प्रा. किरण पवार, प्रा. प्रदीप जगझाप, कार्यालय अधीक्षक श्री. सुनील गोसावी तसेच सर्वज्युनिअर व सिनियर विभागातील विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित या वृक्षारोपण उपक्रमामुळे महाविद्यालय परिसर अधिक हिरवागार होण्यास मदत होणार असून पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचणार आहे.

# शरदचंद्रजी पवार साहेब अभ्यासिका स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी

## प्रदीप वळसे पाटील । मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या नियोजनामुळे अभ्यासिकेचा नावलौकिक

• **निघोज । वीरभूमी**– शरदचंद्रजी पवार साहेब अभ्यासिका स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत असून, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टने केलेल्या उत्कृष्ट नियोजनामुळे या अभ्यासिकेचा नावलौकिक वाढला असल्याचे प्रतिपादन भिमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील यांनी केले.

प्रदीप वळसे पाटील यांनी मळगंगा देवीचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतला. त्यानंतर त्यांनी शरदचंद्रजी पवार साहेब अभ्यासिका, ट्रस्ट कार्यालय, जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसरातील पर्यटक निवास व्यवस्था तसेच भोजन कक्षाची पाहणी केली. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष वसंत कवाद व उपाध्यक्ष अमृताशेठ रसाळ यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी भिमाशंकर कारखान्याचे संचालक रामचंद्र ढोबळे, माजी सरपंच ठकाराम लंके, घोड-कुकडी प्रकल्प कालवा सल्लागार समितीचे सदस्य प्रकाश वायसे, ऊस विकास अधिकारी सोमेश्वर दीक्षित, ट्रस्टचे सहसचिव विश्वासराव शेटे, संघटक मंगेश वराळ, विश्वस्त ॲड. ज्ञानेश्वर लामखडे, संतोष रसाळ, बाळासाहेब लंके, अनिल लंके, बबनराव ससाणे, संदीप वराळ, अनिल लामखडे, व्यवस्थापक महेश ढवळे, रविंद्र रसाळ, दत्तात्रय वरखडे, पोपटराव तरटे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना वळसे पाटील म्हणाले की, ट्रस्टचे अध्यक्ष वसंत कवाद, उपाध्यक्ष अमृताशेठ रसाळ आणि सर्व पदाधिकाऱ्यांनी विकासाभिमुख दृष्टीकोन ठेवून प्रभावी नियोजन केले आहे. त्यामुळे राज्यातील जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवी तीर्थक्षेत्रासह जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसराचा पर्यटनाच्या माध्यमातून उल्लेखनीय विकास झाला आहे.

ते पुढे म्हणाले की, ट्रस्टची शरदचंद्रजी पवार साहेब इमारत अत्यंत देखणी असून येथे उभारण्यात आलेल्या अभ्यासिकेचे नियोजन लोकसहभागातून करण्यात आले आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला. गेल्या दोन वर्षांत शेकडो विद्यार्थ्यांनी या अभ्यासिकेचा लाभ घेत स्पर्धा परीक्षांमधून अधिकारीपद मिळविले आहे. त्यामुळे गाव व तालुक्याचा नावलौकिक वाढला आहे. सर्व पदाधिकारी, विश्वस्त मंडळ, सभासद, गावकरी, मुंबईकर मंडळ तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्यातील समन्वयामुळे विकासकामांना गती मिळाली असल्याचेही त्यांनी सांगितले.



यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष वसंत कवाद व उपाध्यक्ष अमृताशेठ रसाळ यांनी ट्रस्टच्या कार्याची तसेच परिसर विकासाची माहिती दिली. संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब कवाद यांनी ट्रस्टची स्थापना करताना सामाजिक कार्य आणि सेवाभाव हा मुख्य उद्देश ठेवला होता. त्याच उद्देशाची पूर्तता आज मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट संचालित मळगंगा प्रसादालयाच्या माध्यमातून होत असून, या प्रसादालयाचा लाभ दररोज शेकडो भाविक आणि गरजू गावकऱ्यांना मिळत आहे. मळगंगा देवी तीर्थक्षेत्र तसेच जगप्रसिद्ध रांजणखळगे पर्यटन क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर विकासकामे झाली आहेत. मळगंगा देवीच्या कृपेने या परिसरात समृद्धी निर्माण झाली असल्याचे कवाद व रसाळ यांनी सांगितले. सूत्रसंचालन मंगेश वराळ यांनी केले. तर सहसचिव विश्वासराव शेटे व विश्वस्त संतोष रसाळ यांनी आभार मानले.